# न्या. रानडे : विवेकी जीवनदृष्टीचा आदर्श

न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या कार्याची स्मृती जागृत ठेवण्यासाठी राष्ट्रीय सामाजिक परिषदेने सुरू केलेला हा पुरस्कार यंदा मला देऊन एक थोर विभूतीमत्त्वाला अभिवादन करण्यच संधी आपण मला दिली याबद्दल मी आपला ऋणी आहे. त्यातही हा पुरस्कार माझे एक जुने स्नेही न्या विकास सिरपूरकर यांच्या हस्ते मला मिळतो आहे ही माझा आनंद द्विगुणीत करणारी बाब आहे. रानड्यांचे शिष्यत्व ज्यांना भूषण वाटत होते त्या न्या. गोपाळ कृष्ण गोखल्यांनी ‘अडखळत चालणाऱ्या मनुष्य समाजाचे मार्गदश्रन करण्यासाठी जन्माला आलेला अवताररी पुरुष’ असे रानड्यांचे वर्णन केले आहे. ज्यांनी अनेकदा आपले मतभेद व्यक्त करण्यासाठी रानड्यांच्यावर कठोर शाब्दिक हल्ले चढविले आणि रानड्यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिक संस्थांच्या नियंत्रणासाठी संघर्ष केले त्या लोकमान्य टिळकांनी ‘महाराष्ट्र देश ज्या वेळी एक थंड गोळा होऊन पडला होता तेव्हा कोणत्यारीतीने ऊब दिली असताना तो पुन्हा सजीव होईल याचा रात्रंदिवस विचार करून अनेक दिशांनी, अनेक उपयांनी व अनेक रीतींनी प्रथम माधवरावाजींनीच जीवापाड मेहनत केली’ असे रानड्यांच्या कार्याचे वर्णन केले आहे. ज्ञानाचा विस्तार, प्रज्ञेची विशालता आणि दूरदृष्टी याबाबत न्या. रानड्यांची बरोबरी करू शकेल असा  दुसरा माणूस भारताच्या इतिहासात सापडत नाही. अशी त्यांची थोरवी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितली आहे. अशा एका वंद्य विभूतींच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळणे हा माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा सन्मान आहे, अशी माझी भावना आहे. म्हणून अतिशय नम्रतापूर्वक आणि कृतज्ञतेच्या भावनेने या पुरस्काराचा मी स्वीकार करीत आहे.

न्या. रानड्यांचा जन्म झाला त्यावेळी महाराष्ट्रात इंग्रजी राजवटीला नुकताच प्रारंभ झाला होता. नव्या राजवटीच्या कारभाराचे पहिले अर्धशतक संपण्याच्या सुमाराला रावसाहेबांचे सार्वजनिक जीवन सुरू झाले. त्यांच्या कर्तृत्वाची  उणीपुरी पस्तीस वर्षे महाराष्ट्राला आणि भारताला लाभली. महाराष्ट्रातले मराठी राज्य संपून सुरू झालेले इंग्रजी राज्य हा भारतात अनेकदा घडलेल्या सत्ताबदलासारखाच आणखी एक बदल नव्हता. राज्यकर्त्यांचा धर्म वेगळा होताच; परंतु त्यांची संस्कृती, भाषा आणि मूल्यव्यवस्था हीही भारताला अपरिचित होती. सामान्य माणूस अशा बदलामुळे दिङ्मूढ होणे, भांबावून जाणे स्वाभाविक होते. इंग्रजी राजवटीचे काय परिणाम आपल्यावर होतील आणि आपण या राजवटीकडून काय अपेक्षा केली पाहिजे याविषयी जाणत्या मराठी माणसांनी विचार करावयाला सुरुवात केली होती; परंतु देशाच्या व समाजाच्या भवितव्याचा  विचार करून जीवनाच्या सर्व क्षेत्रात मार्गदर्शन करण्याची क्षमता असलेला विचारवंत नेता. न्या. महादेव गोविंद रानडे यांच्याच रूपाने मिळाला.

रावसाहेब रानड्यांच्या कार्याचे सूत्र संक्षेपाने सांगावयाचे तर देशभक्ती ही त्यांची प्रेरणा होती, समाजात स्वाभिमान जागृत करणे व आत्मविवास निर्माण करणे आणि त्याद्वारे समाजाला सक्षम बनविणे हे त्यांचे धोरण होते, शासन आणि समाज यांचे चिकित्सक परीक्षण करणे व त्यांच्या शुद्धीकरणासाठी मार्गदर्शन करणे ही त्यांची महत्त्वाची कामगिरी  होती. समाजाचे संस्थात्मक जीवन समृद्ध करणे व त्यांच्याद्वारे शासन आणि जनता यांच्यात आणि समाजातील विविध घटकांत संवाद प्रस्थापित करण्याचा, लोकशाहीव्यवस्थेची  जीवनमूल्ये समाजमानसात रुजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. राजकीय अधिकार, सामाजिक समता, व्यक्तिस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांना प्राधान्य देणारी समाजव्यवस्था निर्माण व्हावी असे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

रानड्याचा आणि त्यावेळच्या मराठी नेतृत्वापैकी इतरही अनेक उदारमतवादी नेत्यांचा आणखी एक विशेष नोंदविला पाहिजे. समाजेतिहासाचा अभ्यास करणारी आजची मंडळी प्रामुख्याने व्यक्तीची जात अगर वर्ग यामुळे काही हितसंबंध निर्माण होतात व सामान्यतः त्याच हितसंबंधासाठी ती व्यक्ती काम करते, असे गृहीत धरतात. कित्येकवेळा यामुळे फसगत होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, भाऊ महाजन, जगन्नाथ शंकरशेट, सदाशिवराव गोवंडे, म. जोतिबा फुले, न्या. रानडे यांच्यापैकी कोणीही आपला विचार किंवा कार्य आपली जात किंवा वर्ग यांच्यापुरते सीमीत किंवा फक्त त्यांच्याच कल्याणासाठी केलेले नाही. आपल्या विचारांच्या आणि सहानुभूतीच्या कवेत समाजाचा जास्तीत जास्त वर्ग घेण्याचा प्रयत्न यापैकी प्रत्येकाने केलेला आहे आणि हे महाराष्ट्राचे भाग्य आहे.

रानड्यांच्या व्यापक सामाजिक दृष्टीचे एक उदाहरण महत्त्वाचे आहे. पुण्याला डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाल्यानंतर काही दिवसांनी म. फुल्यांचे एक सहकारी आणि बहुजन समाजातील एक शिक्षणप्रेमी कार्यकर्ते गंगारामभाऊ म्हस्के रानड्यांना भेटले. बहुजन समाजाचे शिक्षण व्हावे यासाठी काय करावे याबाबत त्यांनी रानड्यांचे मार्गदर्शन मागितले. ‘ब्राह्मण जात छोटीसी आहे. केवळ त्या जातीची सुधारणा होऊन कसे भागेल? सर्वच समाजाचे शिक्षण झाले पाहिजे,’ असे रानड्यांनी सांगितल्याचे पांडुरंग चिमणाजी पाटलांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे. शिवाजी मराठी एज्युकेशन सोसायटीच्या 1984-85 च्या सुमाराल झालेल्या स्थापनेला न्या. रानड्यांचेही प्रोत्साहन होते. रामचंद्र अप्पाजी कळसकर यांच्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीने दलितांसाठी पाच शाळ काढल्या होत्या. या संस्थेला रानड्यांचे मार्गदर्शन व साहाय्य होते अशी नोंद सुबोध पत्रिकेत आहे. सत्यशोधक समाजाच्या अनेक कार्यक्रमांना रावसाहेब रानडे हजर असत, असे फुल्यांचे एक चरित्रकार पंढरीनाथ पाटील यांनी नमूद केले आहे. लखनौ येथे झालेल्या सामाजिक परिषदेत झालेल्या ‘मी हिंदू नाही आणि मुसलमानही नाही’ हे रानड्यांचे प्रसिद्ध भाषण सार्वजनिक जीवनात धर्म आणण्याची गरज नाही हे सांगणारे व सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचा एक प्रयत्न करणारे आहे. सरकारकडे अर्ज पाठवून फारसा उपयोग होत नाही हे माहीत असताना पुन्हा अर्ज का करावयाचे असा प्रन गोखल्यांनी विचारला असता हे अर्ज सरकारला उद्देशून लिहिले असले तरी ते खरे जनतेला उद्देशून असतात व लोकशिक्षण हा त्याचा हेतू असतो, असे रानड्यांनी उत्तर दिले. नेमस्त राजकारणसुद्धा लोकजागृती करण्यासाठी असते अशी रानड्यांची स्वच्छ भूमिका होती.

रानड्यांचे क्रांतिकारकत्व त्यांच्या धर्मविषयक विचारात प्रगट झाले आहे. जिवंत परंपरेचे सतत अंतर्गत मूल्यमापन होणे इष्ट असते आणि हिंदू धर्म ही विकसनशील परंपरा आहे त्यामुळे या धर्मविचारात सतत सुधारणा होऊ शकते हे रानड्यांनी सांगितले. धर्मात घुसलेले हीण काढून टाकण्याची शक्त हिंदू धर्म आज गमावून बसला आहे. स्वयंनियमनाची ही शक्ती फार महत्त्वाची होती असे त्यांना वाटते. सर्वांशी प्रेमाने वागावे हे धर्माचे सार आहे व प्रेम आणि सेवा हे उपासनेचे मार्ग मानावयाचे असतील तर त्यासाठी नवा छाप मारून घ्यावयाची (म्हणजे ख्रिस्ती होण्याची) गरज नाही, असेही त्यांनी सांगितले आहे. नैसर्गिक शक्तीचे रूपांतर क्षमतेमध्ये करणे आणि क्षमतेचा उपयोग मनुष्याच्या विकासासाठी होणे ही ईवरसेवा आहे, असे ऑरिस्टॅाटलच्या इहवादी संकल्पनेचा धर्माच्या अवगुंठनात बसणारे एक नवेच वैचारिक कलम रानड्यांनी केले आहे. धर्माचे प्राप्तव्य सुख नाही तर मनुष्याचा विकास आहे असे रानडे म्हणतात. भक्तिमार्ग हाच योग्य मार्ग आहे, असे सांगणारे रानडे ईवरभक्तीला एक करणात्मक, कर्मकांडनिरपेक्ष आणि काही प्रमाणात इहवादाची जोड देऊ इच्छित आहेत.

पुरोहित वर्गाबद्दल न्या. रानड्यांनी जो विचार मांडला आहे तो फारच क्रांतिकारक आहे. त्यांनी म्हटले आहे- ‘पुरोहितांचा संघटित वर्ग समजोपयोगी असतो. परंतु जन्माधिष्ठित, वंशपरंपरागत पुरोहित जातीचे संघटन वा

सर्वसामान्य जनसमुदायापासून वेगळे व विरोधी असे स्वतःचे हितसंबंध असणाऱ्या व बाहेरच्यांना प्रवेश नाकारणाऱ्या पुरोहितागिरीमुळे समाजाचा धात होतो.

न्या. रानड्यांच्या मर्मदृष्टीची आणि मूलगामी विचार करण्याच्या क्षमतेची आणखी उदाहरणे सांगता येतील. त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचे अनेकांनी गुणगान केले आहे. मला त्याहीपेक्षा महत्त्वाची वाटते ती त्यांच्या ठिकाणी असलेली हृदयाची विशालता. सार्वजनिक जीवनात मतभेदाचे अनेक प्रसंग येतात. तसे रावसाहेबांच्याही जीवनात आले. अनेकांनी कठोरपणे ते व्यक्त केले. संस्थांच्या नियंत्रणासाठी संघर्षही केले. काहींनी मानसिक छळही केला. हे सर्व पचवून अशा सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या गुणांची जागा ठेवून रानड्यांनी त्यांनाही वेळ पडली त्या त्या वेळी मार्गदर्शन केले. इतरांच्या पापांन, चुकांना, स्वभाव दोषांना पोटात घेऊन प्रवाहात त्यांना पुढे जाण्यासाठी मदत करावी अशी रानड्यांची गंगादृष्टी होती.

आज न्या. रानड्यांच्या थोरवीचा विचार करताना प्रथम जाणवतात ते भारतीय मानसिकतेत उदारमतवादी मूल्ये रुजविण्याचे त्यांनी केलेले प्रयत्न. माणूस स्वतंत्र व्हावयाचा तर त्याला धर्माच्या नावावर जखडणाऱ्या कर्मकांडांच्या, अंधश्रद्धांच्या, अनिष्ठ चालीरीतींच्या बंधनातून सोडवाचे लागेल. मुक्त करावे लागेल, याच अर्थाने रानड्यांनी खरी सामाजिक सुधारणा म्हणजे मुक्ती अशी व्याख्या केली आहे. राज्याने नागरिकाच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालता कामा नयेत, सर्वांना समान संधी देणारा, सहिष्णुता आणि परस्पर प्रेम यांच्यावर आधारलेला नवा समाज अस्तित्वात येणे आवयक आहे हे त्यांना दिसले होते. अशा समाजाची धारणा पेलवण्याइतके आणि उत्कर्षाची अपेक्षा करण्याइतके आवासन या भूमीत आहे हेही त्यांना जाणवले होते. सुशिक्षित भारतीयांना त्यांनी उदारमतवादी बनवण्याचा, कार्यप्रवण करण्याचा प्रयत्न केला आहे. रानडे कर्मकांडाच्या, अनष्ठि रुढींच्या जंजाळात जखडलेला धर्म मुक्त करू पाहत होते. सरकारच्या कारभारावर विधायक टीका करण्याचा व लोकमताचे दडपण तयार करण्याचा प्रयत्न करीत होते. ऐच्छिक सभासदत्व असलेल्या सरकारनिरपेक्ष सार्वजनिक संस्था आणि सार्वजनिक संवाद यांच्याद्वारे समाजाला स्वयंनिर्णयाचे सामर्थ्य मिळवून देत होते. खरे म्हणजे भारतात पुढे येणाऱ्या लोकशाही व्यवस्थेसाठी जनतेची आवयक मानसिकताच न्या. रानडे तयार करीत होते.

न्या. रानड्यांना जाऊन आता एक शतक उलटून गेले. आपल्या लोकशाही प्रजासत्ताकाच्या स्थापनेलाही अर्धशतक होऊन गेले. रावसाहेब रानड्यांनी ज्या मूल्यांची पायाभरणी करण्याचा प्रयत्न केला ती आपण कितपत जपली? आपल्यापेक्षा वेगळे असणारे मत शांतपणे ऐकण्याची, ते समजून घेण्याची आपली तयारी असते का? विविध समाजघटकात सहिष्णुता, प्रेम आणि बंधुभाव नांदतात का? राजकीय व सामाजिक बाबतीत निर्मळ मनाने आपण इतरांशी संवाद करू शकतो की तात्कालिक स्वार्थासाठी द्वेषाचा आपण शस्त्र म्हणून वापर करू लागलो आहोत? लोकशाही समाजव्यवस्थेला दृढमूल करणाऱ्या, राबवणाऱ्या संस्थाचे कामकाज आपण कसे केले? त्यांचे पावित्र्य कितपत टिकविले?

ज्या ऐच्छिक संस्थांच्या माध्यमातून समाजाने स्वातंत्र्य जोपासण्याचा प्रयत्न रावसाहेब रानडे आणि त्यांच्या पिढीने केला तशा संस्थांची आज काय स्थिती आहे? जीवनाची शक्य तेवढी क्षेत्रे राजकीय सत्तेच्या हस्तक्षेपापासून मुक्त राखण्याचा प्रयत्न केला की आपले नागरी स्वातंत्र्य आपण सत्तेच्या वळसंगी घालून टाकले? सरकार परकीय होते तेव्हा अशा संस्था स्वातंत्र असाव्या लागतात. अशा संस्था आज दुबळ्या होत आहेत. सामुदायिक कल्याणाचे एक माध्यम व लोकमताच्या अभिव्यक्तीचे एक साधन म्हणून अशा संस्थांचे आज फारसे महत्त्व उरलेले नाही. समाजजीवनाची सर्व क्षेत्रे राजकारण जेव्हा व्यापून टाकते तेव्हा नागरी जीवन आपोआपच दुबळे होते.

न्या. रानडे यांनी आचरणातील एक पथ्य आयुष्यभर पाळले. रानडे एक सरकारचे नोकर होते, परंतु त्याचवेळी ते भारतीय जनतेचे मार्गदर्शक होते. ते न्यायाधीश होते व त्याचवेळी समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण

अशा विविध जीवनांगाबद्दल स्वतःची मते असणारे व निर्भीडपणे ती मांडणारे नेते होते. या दोन्ही भूमिका कोणत्याही एकाच्या कर्तव्यांना व निष्ठांना बाध येऊ न देता त्यांनी पाडल्या. आजच्या स्वातंत्र्याच्या काळातही असे जमणे फार अवघड आहे. रानड्यांना हे जमू शकले याचे कारण त्यांची कार्यनिष्ठा व विवेकपूर्ण जीवनदृष्टी. गोवालिया ॲाक मैदानावरील 42 सालच्या काँग्रेस अधिवेशनात देशाविषयीची कर्तव्याची जाण असलेला सरकारी नोकर कसा असावा हे सांगताना म. गांधींनी न्या. रानड्यांचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. आजच्या काळातही रानड्यांचे याबाबत अगदी थोडेही अनुकरण करता आले तर कोणालाही धन्यता वाटेल.

आजही आपल्याला दिशादिग्दर्शन करण्याचे सामर्थ्य न्या. महादेव गोविंद रानडे यांच्य पुण्यस्मरणात निचित आहे. दीपस्तंभ थोडार दूर गेला असला तरी त्याचा अजूनही दिसणारा प्रकाश आपल्याला दिशेचे भान अजूनही देऊ शकतो. या पुरस्काराच्या निमित्ताने राष्ट्रीय सामाजिक परिषदेने मला आपणा सर्वांच्या साक्षीने त्या महापुरुषाचे, त्याच्या कर्तृत्वाचे आणि त्याच्या मार्गदर्शनाचे स्मरण करण्याची, त्याला अभिवादन करण्याची संधी दिली याबद्दल सामाजिक परिषदेचा, तिच्या चालकांचा आणि आपणा सर्वांचा मी फार फार आभारी आहे.

*(राष्ट्रीय सामाजिक परिषदेने दिलेला*

*न्या. महादेव गोविंद रानडे पुरस्कार स्वीकारताना*

*केलेले भाषण : 8 जुलै 2006, पुणे)*